# आत्महत्या करणाऱ्यांमध्ये सर्वाधिक हिंदू शेतकरी-बच्चू कडू



## हा फक्त इशारा आहे, न्याय न मिळाल्यास उग्र आंदोलन

## वाडा आंदोलनातून सरकारला दिला इशारा



महासागर प्रतिनिधी

*अमरावती,( दि.7 ) - पश्चिम विदर्भात वर्षभरात 1 हजार 151 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या असताना या प्रश्नावर सरकारची संवेदनशीलता दिसत नाही. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये सर्वाधित हिंदू शेतकरी आहे. राज्यात आणि केंद्रात हिंदुत्ववादी सरकार आहे. तरीही हिंदू शेतकऱ्यांवर स्वतःला संपवण्याची वेळ का येते ? असा संतप्त सवाल बच्चू कडूंनी सरकारला विचारला आहे.*

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू आणि राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांच्या नेतृत्वात येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर शेतकरी आणि मेंढपाळांच्या विविध मागण्यांसाठी 'वाडा आंदोलन' सुरू करण्यात आले आहे. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना बच्चू कडू यांनी सरकारवर टीका केली.

**अजित दादा, कुठं गेला तुमचा वादा!**

मी भाषणात वारंवार म्हणतोय हिंदू शेतकरी, हिंदू मेंढपाळ. मी हे का बोलतोय कारण धर्माच्या नावाने काहीजण राजकारण करताय. एकीकडे शेतकरी मरतोय, दुसरीकडे मेंढपाळ मरतोय. राज्यात बगर मेहनतीच्या योजना सुरू केल्या. मात्र ज्यांना डोळे नाही, पाय नाही त्यांना चार महिन्यापासून पगार नाही. त्यामुळे अजितदादा कुठं गेला तुमचा वादा. अशा म्हणण्याची वेळ आली आहे. आज फक्त इशारा आहे. कायदा मोडून हात लावला तर उद्या हातात कायदा घेतल्या शिवाय राहणार नाही. असा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी यावेळी दिला.



### शेळ्या, मेंढ्या, घोड्यासह धडकले आंदोलक

येथील संत गाडगेबाबा मैदानावरून मोर्चाला सुरूवात झाली. मेंढपाळाच्या वेशात घोड्यांवर स्वार होऊन बच्चू कडू आणि महादेव जानकर हे विभागीय आयुक्त कार्यालयावर पोहचले. मोर्चादरम्यान कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मोर्चात शेळ्या, मेंढ्या आणि घोड्यांसह शेकडो आंदोलक सहभागी झाले होते.राज्य सरकारने विधानसभा निवडणूकीच्या काळात घोषीत केलेली सरसकट कर्जमाफी शेतकऱ्यांना तातडीने मिळावी, चराईकरिता परराज्यातून येणाऱ्या मेंढपाळांवर बंदी घालण्यात यावी अश्या अनेक मागण्या यावेळी 'वाडा आंदोलना'तून करण्यात आल्या आहेत. या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर विभागीय कार्यालय परिसरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता.

### काँग्रेस गद्दार तर भाजपा महा गद्दार - महादेव जानकर

येथून पुढे मोठ्या पक्षांना मतदान करू नका असं आवाहन करत काँग्रेस गद्दार तर भाजपा महा गद्दार असल्याचा आरोप राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते आणि माजी मंत्री महादेव जानकर यांनी केला. आज अमरावतीत इशारा देण्यासाठी आंदोलन झालं असलं तरी पुढचं आंदोलन हे पुण्यात होईल असं महादेव जानकर म्हणाले.

### हम रुकने वाली नही, चलने वाली औलाद है!

चारा आहे पण हात लावू देणार नाही, हा कसला कायदा आहे. बटेंगे को कटेंगे म्हणताय, तर मग मेंढपाळ पण कटणार ना ? आता जर कर्ज भरलं नाही तर पुढच्या वर्षी कर्ज भेटणार नाही, कृषिमंत्री म्हणाले की, आर्थिक परिस्थिती चांगली नाही. त्यामुळे चार-पाच महिने कर्जमाफी होणार नाही. मग बोंबलले कशाला. जेवायला बोलवायचं आणि पळून जायचं. मात्र 'हम रुकने वाले औलाद नही, चलने वाले औलाद है', न्याय हक्कासाठी मेलो तरी चालेल. असा निर्धारही बच्चू कडूंनी यावेळी बोलताना केला आहे.




# एचएमपीव्हीबाबत सूचनांचे नागरीकांनी पालन करावे!

## आरोग्य विभागाचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.7 )** - चीनमध्ये मानवी मेटान्यूमो व्हायरसचा उद्रेक झाल्याच्या पार्श्वभूमीवर नागरीकांनी दक्षता बाळगावी, तसेच आरोग्य विभागातर्फे एचएमपीव्हीबाबत देण्यात येणाऱ्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

मानवी मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) तीव्र श्वसन संसर्गाचे प्रमुख कारण आहे. हा विषाणू सर्वप्रथम नेदरलँडमध्ये 2001 मध्ये आढळला. मानवी मेटान्यूमोव्हायरस सामान्य श्वसन विषाणू आहे. या विषाणूमुळे श्वसनमार्गाच्या वरील भागातील संसर्गास सर्दीसारख्या आजारास कारणीभूत ठरते. हा एक हंगामी रोग आहे, जो सामान्यतः आरएसव्ही आणि फ्लूप्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीला उद्भवतो. याबाबत डीजीएचएस आणि संचालक, एनसीडीसी, दिल्ली यांनी दि. 3



जानेवारी 2025 रोजी एक निवेदन प्रसिद्ध केले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील श्वसनाच्या संसर्गाच्या आकडेवारीचे विश्लेषण केले आहे. वर्ष 2023च्या तुलनेत डिसेंबर 2024 मध्ये कोणतीही वाढ झाली नाही. तथापि खबरदारीचा एक भाग म्हणून नागरिकांनी श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी काय करावे आणि काय करू नये, या संदर्भातील सूचनांचे पालन करण्याचे आवाहन आरोग्य विभागानं केले आहे.

आजारापासून बचाव करण्यासाठी खोकला किंवा शिंका येत असल्यास तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाकावे. साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने हात वारंवार धुवावे. ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणापासून दूर राहावे. भरपूर पाणी प्यावे आणि पौष्टिक अन्न खावे. संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन (व्हेंटीलेशन) होईल, याची दक्षता घ्यावी. तसेच हस्तांदोलन करू नये. टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर करावा. आजारी लोकांशी जवळचा संपर्क टाळावा, डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करू नये. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेणे टाळावे, अशा सूचना करण्यात आल्या आहे.

### घाबरु नका, काळजी घ्या!

चीनमधून आलेला नवीन विषाणू मानवी मेटान्यूमोव्हायरस अहवालाबाबत चिंतेचे कारण नाही. याबाबत आवश्यक दक्षता घेण्यात येत आहे. नागरिकांनी नाहक भितीचे वातावरण निर्माण करण्याची गरज नाही. तथापि या पार्श्वभूमीवर सर्दी, खोकला अर्थात आयएलआय, सारी रुग्णांचे नियमित सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

# माहिती कार्यालयात आचार्य जांभेकरांना अभिवादन

**अमरावती** - मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी 6 जानेवारी 1832 रोजी पहिले मराठी नियतकालिक दर्पण सुरू केल्यानिमित्ताने मराठी पत्रकार दिन साजरा करण्यात येतो. यानुषंगाने जिल्हा माहिती कार्यालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटूरवार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कार्यालयातील विजय राठोड,



सागर राणे, साजिद शेख, राजश्री चौरपगार उपस्थित होते. उपस्थितांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.


Universal Sompo General Insurance
Suraksha, Hamesha Aapke Saath

Universal Sompo General Insurance Co Ltd

PUBLIC NOTICE

RELOCATION OF REGISTERED OFFICE

All our Customers, Constituents and Members of Public are here by informed that our Registered office located at **Plot No. 208, Sheet No. 2, Mamatta No. 128, Indira Gandhi Chowk, At Post Anjangaon Bari Tal & Dis.Amravati, Maharashtra - 444 70**, Maharashtra, India will be relocated and would remain operational from new address at **Shop no 9, Arjun Nagar Bus Stop Shatau Market, Morshi Road, Amravati – 444603**, Maharashtra, India w.e.f Tuesday, March 25,2025

Additionally, for any queries, feel free to contact us at our toll-free number 1800 22 4030/1800 200 4030/1800 200 5142 or write to us on contactus@universalsompo.com.

By Order of the Board
For Universal Sompo General Insurance Co Ltd
Sd/-
Aarti Kamath
Company Secretary


# भाजपा कॉटन मार्केट मंडळातर्फे सदस्यता नोंदणी कार्यशाळा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 7 )** - भारतीय जनता पक्ष कॉटन मार्केट मंडळाच्या वतीने सदस्यता नोंदणी अभियान कार्यशाळेचे आयोजन क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती पर्वावर करण्यात आले होते. शहराध्यक्ष प्रवीण पोटे, प्रदेश सचिव जयंत डेहनकर, प्रदेश सदस्य सुनील साहू, महामंत्री सतीश करेशिया, शहर सचिव राजू राजदेव, युवा अध्यक्ष कौशिक अग्रवाल, भाजपा कॉटन मार्केट मंडळ अध्यक्ष सचिन नाईक यांच्या प्रमुख मार्गदर्शनात ही कार्यशाळा पार पडली. कार्यशाळेला मनोहरलाल धामेचा, मनोज काळे, कामेश साहू, गोविंद चुलेट, रामचंद पिंजानी, राजेश साहू, प्रमोद राऊत, निता राऊत, श्रीचंद तेजवानी, दीपक वाधवानी, शैलेश मिश्रा, जितेंद्र थदानी, ईश्वर माखिजा, सुरेश पुरसवानी, राम आहुजा, हरीश त्रिकोटी, अजय पोपटानी, प्रदीप पांडे, सुरेश डोंगरे, अनिकेत तायडे, अलकेश इंगळे, लिला गोडबोले, हरीश नागवानी आदी उपस्थित होते.


# ग्रामपंचायत कार्यालय तळवेल

## पंचायत समिती चांदूर बाजार, जि. अमरावती

## निविदा सुचना क्र.- ०२/२०२४-२५ दि. ०७/०१/२०२५

ग्रामपंचायत कार्यालय तळवेल ता. चांदूर बाजार जि. अमरावती यांचे मार्फत १५ वा वित्त आयोग, जनसुविधा, स्वच्छ भारत मिशन, अनु. जाती व नवबौद्ध घ. विकास (दवसी) योजने अंतर्गत जि.प. शाळा बऱ्हाणपूर शौचालय बांध. सि.कॉ. नाली, बौद्ध स्मशानभुमी तार कम्पाउंड, सा. धन. व्यव. कंपोस्ट पिट तळवेल, सा. धन, व्यव. प्लॉस्टीक शेड व कम्पोस्टपिट बऱ्हाणपूर कामाची मोहरबंद बी-१ निविदा पद्धतीने नोंदणीकृत कंत्राटदाराकडून बंद लिफाफा पद्धतीने निविदा पुढिल प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहे.

कोरे निविदा ग्रामपंचायत तळवेल, पंचायत समिती चांदूर बाजार, जि. अमरावती कडून देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजना | अंदाजित किंमत रूपये (लाख) | बयाणा रक्कम (१%) रूपये | कामाची मुदत महिने | निविदा प्रसिद्धीची वेळ | पंजीबद्ध कंत्राटदाराचे वर्गीकरण | कोऱ्या निविदेची किंमत | कोऱ्या निविदा देण्याची तारीख व वेळ | भरलेल्या निविदा स्विकृतीचा दिनांक व वेळ | निविदा उघडण्याची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जि.प. शाळा बऱ्हाणपूर शौचालय बांधकाम | स्वच्छ भारत मिशन | ३,००,००० | ३००० | १ महिने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० रू. | ८/१/२५ ते १५/१/२५ | ८/१/२५ ते १५/१/२५ | ग्रा.पं. तळवेल मासिक सभा माहे जानेवारी २०२५ |
| २ | सिमेंट कॉ. नाली | अनु. जामती नवबौद्ध प. विकास | ५,००,००० | ५००० | १ महिने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० रू. | | | |
| ३ | बौद्ध स्मशानभूमी तार कम्पाउंड | जनसुविधा | ५,००,००० | ५००० | १ महिने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० रू. | | | |
| ४ | सा. धन. व्यव. कम्पोस्ट पिट तळवेल | १५ वित्त आयोग | १,१५,००० | ११५० | १ महिने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० रू. | | | |
| ५ | सा.धन. व्यव. प्लॉस्टीक शेड व कम्पोस्ट पिट बऱ्हाणपूर | १५ वित्त आयोग | २,२१,००० | २२१० | १ महिने | पहिली | वर्ग ५ व त्यावरील | ५०० रू. | | | |

टिप :- १) निविदेच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालय, तळवेल ता. चांदूर बाजार जि. अमरावती यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील.

२) निविदा ह्या दोन लिफाफे पद्धतीने सादर करावयाच्या आहेत.

३) निविदा स्वीकारण्याचे तसेच काही कारणास्तव निविदा रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेले आहेत.

**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत तळवेल**


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# बनावट नोटाप्रकरणी आणखी 2 आरोपींना सातारामधून अटक

## चांदूर रेल्वे पोलीसांची कारवाई ■ 100 रूपयांच्या 31 बनावट नोटा जप्त, दोन्ही आरोपींना 9 जानेवारीपर्यंत पीसीआर

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि.7 )**– चांदूर रेल्वे शहरात 100 रुपयांच्या बनावट नोटा घेऊन फिरणाऱ्या एका युवकाला अटक केल्याची कारवाई स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीणने 2 जानेवारीला केली होती. या प्रकरणाचा चांदूर रेल्वे पोलीसांनी खोलात तपास सुरू केला असता आणखी दोन आरोपींना सातारावरून मंगळवारी (ता. 7) अटक केली. नितीन चंद्रकांत जाधव (वय 28 वर्ष) व सूरज मारोती धस (वय 30 वर्ष) दोन्ही रा. मसूर ता. कराड जि.सातारा अशी अटक दोन आरोपींची नावे आहेत. ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनात पीएसआय सुयोग महापुरे यांच्या पथकाने केली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मोहम्मद तस्लीम शेख गफुर हे 2 जानेवारीला रात्री 8.30 वाजताच्या दरम्यान चांदूर रेल्वे




शहरातील आठवडी बाजार येथे पेट्रोलिंग करीत असतांना गोपीनय माहिती मिळाली होती की, एक इसम भारतीय चलनासारख्या दिसर्णाया 100 च्या बनावट नोटा खऱ्या नोटा म्हणुन बाजारात घेऊन फिरत आहे. आरोपीची विचारपुस व अंगझडती घेतली असता त्याचेजवळ हुबुहुब दिसर्णाया 100 च्या 7 नोटा मिळुन आल्या. त्यामुळे या नोटा व मोबाइल किंमत अंदाजे 10 हजार रूपये असा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आला. याप्रकरणी चांदूर रेल्वे पोलीसांत आरोपी अंकुश गुलाबराव सोनकुवर (24 वर्ष, रा. सांगुलवाडा, ता. चांदूर रेल्वे) याच्याविरूध्द बीएनएस कलम 179, 180 अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली होती. अटक आरोपीला शुक्रवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीला 9 जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात 1 अधिकारी व 2 अंमलदार यांचे पथक तयार करून पुणे, सातारा येथे पाठविण्यात आले होते. तांत्रिक माहितीच्या आधारे नितीन चंद्रकांत जाधव व सूरज मारोती धस या दोन आरोपींचा शोध घेऊन, त्यांचे घरझडतीत भारतीय चलनासारख्या हुबेहूब दिसणाऱ्या 100 रूपयांच्या 31 बनावट नोटा मिळून आल्या आहेत. सदर नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. व दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले. सदर रॅकेट अमरावती ग्रामीण आणि लगतच्या भागात पसरले असल्याची शक्यता असुन आणखी इतर आरोपींचा शोध सुरू आहे. अटक दोन्ही आरोपींना मंगळवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोघांना 9 जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सदर कारवाई पोलीस अधिक्षक विशाल आंनद, अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, एसडीपीओ अनिल पवार, पोलीस निरीक्षक अजय आकरे यांच्या मार्गदर्शनात चांदूर रेल्वेचे पीएसआय सुयोग महापुरे व हे. कॉं. अतुल क्षिरसागर, पो.कॉं. प्रदीप पाटील या पथकाने केली.

# शेकडो शेतकऱ्यांना दिला शेतीतून समृध्दी चा मंत्र!



## यशोगाथा युवा शेतकऱ्यांची

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.7 )**– 'केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे' या उक्तीला परिश्रमाची जोड देत जोखीम पत्करत चांदूरबाजार तालुक्यातील रुपेश उल्हे व अभिजीत बंड या दोन युवा शेतकऱ्यांनी शेतीतून समृद्धी चा मार्ग तयार केला आहे.

कपाशी, तूर, सोयाबीन, चना या कोरडवाहू तसेच संत्रा बागायती या पिकावर गेल्या काही वर्षापासून सुरू असलेल्या अस्मानी व सुलतानी संकटामुळे शेतकऱ्यांची पोरं शेतीपासून दूर जात आहे, अशा या परिस्थितीत फक्त कोरडवाहूच पिकासाठी पोषक आहे, असा समज असलेल्या शेतीतुन वडूरा येथील रुपेश उल्हे व खरवाडी येथील अभिजीत बंड या तरुण पोरांनी सहा वर्षांपूर्वी टरबूज लागवडीचा नाविन्यपूर्ण प्रयोग सुरू केला. तेव्हापासून टरबूज आणि खरबूज पिकात कुशल होण्याच्या दृष्टीने त्यांनी दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण उत्पादन घेण्यासह विविध वाणांचे व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर त्यांनी सुरू केला.

केवळ पीक लागवड करून विक्री झाली, म्हणजे सगळे झाले असे होत नाही. बाजारपेठ म्हटलं की तेजी, मंदी आलीच माला बरोबर आपले नावही जोडलेले असते, व्यापाऱ्यांमध्ये प्रसिद्ध होण्यासाठी तुमच्या मालाचा दर्जा उत्तम हवा, सातत्य असल्याने मंदीतही पैसे होतात हे त्यांच्या लक्षात आले म्हणून .या पिकांच्या उत्पादनवाढीसाठी एकात्मिक पीक व्यवस्थापन यामध्ये सेंद्रिय, जैविक व रासायनिक खतांचा संतुलित अवलंब पिकांच्या उत्पादकतेसाठी माती, पाणी, बियाणे व्यवस्थापनाला सर्वाधिक महत्त्व दिले, लागवडीवर जास्त भर देत, नासिक च्या रोपवाटिकेतून निरोगी रोपे तयार करून घेतली. आणि.. हाच त्यांचा टर्निंग पॉईंट ठरला असे म्हणता येईल कपाशी, सोयाबीन, तूर हे पारंपरिक पीक घेतल्या नंतर उण्यापुऱ्या तीन महिन्यांत एकरी लाखोंचे उत्पन्न हे पीक देत गेले. मग फक्त या पिकावर न थांबता व वर्षभर टरबूज, खरबूज, टोमॅटो, झेंडू, सोबतच भाजीपाला वर्गीय पिकातून समृद्धीकडे वाटचाल या तरुणांची सुरू झाली. बघता-बघता तालुक्यातील शेकडो तरुण शेतकऱ्यांनी या युवा जोडगोळी ची वाट चोखळली आहे. सद्यस्थितीत लागवडी पासून ते विक्री पर्यन्त चे मार्गदर्शन रुपेश उल्हे शेताच्या बांधावर जाऊन करतो म्हणून गतवर्षी खरवाडी येथील एक हात नसलेल्या दिव्यांग अमोल भाजीपाले या तरुण मुलाने एक एकरातून तबबल 35 टन टरबूज घेऊन साडे तीन लाखाचे उत्पादन घेतले. आज याचा परिपाक म्हणून फक्त आणि फक्त कोरडवाहू पट्टा म्हणून ओळखला जाणाऱ्या या भागात आता बागायती शेती करून समृद्धी ची कास युवा शेतकऱ्यांनी धरली आहे.

### कृषी अधीक्षक कडून शाबासकीची थाप!

अलीकडील काळात हवामान बदलामुळे सर्वच भाजीपाला उत्पादकांपुढे आव्हान निर्माण झाले आहे. प्रत्येक वर्षी वेगवेगळ्या अडचणी येत असतात अनेकदा बियाण्यांची उगवण एकसारखी होत नाही. दुबार टोकनही करावी लागते यामुळे पिकाचा कालावधी कमी जास्त होतो. एकंदरीत ‘शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी’ या संत वचनामध्ये बीजप्रक्रियेचे महत्त्व सांगितले गेले आहे बाब हेरून या पठ्ठ्यांनी अत्याधुनिक रोपवाटिका उभारण्याचा आणखी एक धाडसी स्वप्न दोन वर्षांपूर्वी बघितले व आज ते प्रत्यक्षात उतरविले. चांदुर बाजार तालुक्यातील एकमेव रोपवाटिकेचे उद्घाटन नुकतेचजिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले. या युवकांची शेतीप्रति असलेली प्रतिबद्धता बघून त्यांनी शाबासकीची थाप व मोलाचा सल्ला पण या युवकांना दिला. या वेळी झालेल्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपविभागीय कृषी अधिकारी अनिल बोंडे, रविंद्र वाघमारे, उमेश फुलारी, राहुल सिंग, विश्वजीत चव्हाण, सुधीर जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

## अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांचा दौरा

**अमरावती** – महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान हे दि. 9 जानेवारी रोजी अमरावती येथे दौऱ्यावर येत आहेत.

त्यांच्या दौऱ्यानुसार सकाळी 10 वाजता शासकीय विश्रामगृह, अमरावती येथे आगमन होईल. त्यानंतर सकाळी 10.30 वाजता अल्पसंख्याक समाजाच्या प्रतिनिधींसोबत भेट घेतील. दुपारी 12 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठकीला उपस्थित राहतील. सायंकाळी 4 वाजता अमरावती येथून अकोलाकरीता प्रयाण करतील.

# शिक्षक पुष्पा यावले यांचा सेवापुर्ती सत्कार

## नेरपिंगळाई येथील जिल्हा परिषद कन्या शाळेचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि.7 )**– तालुक्यातील नेरपिंगळाई येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक कन्या शाळेच्या कर्तव्यदक्ष मुख्याध्यापिका पुष्पा निळकंठराव येवले या नियत वयोमानानुसार नुकत्याच सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांच्या सेवा कार्याचा सत्कार म्हणून शाळेच्या वतीने त्यांचा भव्य असा सेवापुर्ती सत्कार सोहळा तथा निरोप समारंभ घेण्यात आला. नेरपिंगळाई केंद्र शाळेच्या वतीने आयोजित जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक कन्या शाळा नेरपिंगळाई येथे घेण्यात आला. या प्रसंगी सर्व शिक्षक या सोहळ्यासाठी हजर होते. तसेच



गावातील अनेक मान्यवर नागरिक नेरपिंगळाई ग्रामपंचायत पदाधिकारी यांनीसुद्धा पुष्पा येवले यांचा शाल श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार केला.

निरोप समारंभ प्रसंगी शाळेच्या विद्यार्थिनी तथा शिक्षक भावूक झाल्याचे दिसत होते. शाळेच्या वतीने दिलेल्या शाल श्रीफळ आणि सन्मान चिन्हाचा स्वीकार केल्यानंतर आपण 35 वर्षे निरंतर झटून सेवा केली या सेवेचाच हा सन्मान आहे असे पुष्पाताई नीलकंठराव यावले यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले. यापूर्वी शाळेचे मुख्याध्यापक असलेले तसेच पंचायत समिती वरुड येथून गटशिक्षणाधिकारी म्हणून सेवानिवृत्त झालेले निळकंठराव येवले तसेच संतोष साव यांचाही याप्रसंगी सत्कार करण्यात आला. अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाळासाहेब खासबागे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच सविता खोडस्कर, मोर्शी पंचायत समितीच्या माजी उपसभापती सोनाली नवले, माजी सभापती पंचायत समिती मोर्शी संजय मंगळे, संजय मोहकर, संजय सुने, नेरपिंगळाई केंद्राचे केंद्रप्रमुख मोहन निघोट हे उपस्थित होते.

# हॅप्पी किड्स स्कूलतर्फे चित्रकला स्पर्धा

**अमरावती** – स्थानिक हॅप्पी किड्स इंटरनॅशनल स्कूलतर्फे चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नर्सरी, ज्युनियर केजी आणि सिनियर केजी आणि पहिली ते दहावीच्या अनेक विद्यार्थ्यांनी सहभागी होत सुंदर रेखाचित्र आनंदाने रंगविले. मुख्याध्यापिका शिल्पा काळबेंडे व अध्यक्ष नीलेश काळबेंडे यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना गौरवचिन्ह व रोख बक्षीसे देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मेळघाटातील त्या गावात प्रथमच पोहचले आमदार



## ■ आदिवासी बांधवांनी जोरदार केले स्वागत
## ■ समस्या सोडविण्याचे दिले आश्वासन

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.7 )**– चिखलदरा तालुक्यात अतिशय दुर्गम असलेल्या कुही या दुर्गम गावात पहिल्यांदाच कुणीतरी आमदार पोहचले. या गावात अजूनही कोणत्याही आमदार किंवा खासदार पोहोचले नव्हते, मात्र नवनिर्वाचित आमदार केवलराम काळे प्रथमच या गावात पोहोचल्याने ग्रामस्थ खूप आनंदीत झाले. त्यामुळे नागरिकांनी जोरदार आमदार केवळराम काळे यांचे स्वागत केले. याप्रसंगी बोलताना आमदार काळे यांनी या गावाचा रस्ता प्राथमिकतेने सोडवणार असे आश्वासन दिले. तसेच या ठिकाणी मोबाईलचे टॉवरसुद्धा उभारण्याचे आश्वासन दिले.

> “या ठिकाणचा रस्ता हतरु ते कुही हा रस्ता प्राथमिकतेने बनण्यासाठी आपण प्रयत्न करू, तसेच या भागात टावर उभारण्यासाठी सुद्धा प्रयत्न केला जाईल. यासह या गावातील नागरिकांना घरकुलची समस्यासुद्धा सोडायला जाईल. या गावातील समस्या प्राथमिकतेने सोडवू.
>
> **केवलराम काळे, आमदार.**

चिखलदरा तालुक्यातील कुही हे गाव तालुक्याच्या ठिकाणापासून शंभर ते दीडशे किलोमीटर अंतरावर असून अतिशय दुर्गम आहे. या ठिकाणी अजूनही जाण्यासाठी व्यवस्थीत मार्ग नाही. नागरिकांना कच्च्या रस्त्यावरून प्रवास करावा लागतो, अजूनही या गावाला पोचमार्ग व्यवस्थित झालेला नाही, त्यामुळे नागरिकांना खडतर मार्गाने प्रवास करावा लागतो. यासह या ठिकाणी अजूनही मोबाईलचे नेटवर्क आलेले नाही. या गावाची लोकसंख्या 300 ते 400 च्या घरात असून या ठिकाणच्या नागरिकांचे जीवनमान अतिशय खडतर आहे. आमदारांच्या आश्वासनामूळे त्यामुळे नागरिकांमध्ये अधिकच उत्साह संचारला असून येत्या काळामध्येआपल्या गावाला ही चांगला रस्ता मिळेल अशा प्रकारच्या अशा गावकऱ्यांमध्ये पल्लवी झाल्या असून मोबाईलचे नेटवर्क सुद्धा मिळणार याचाही आनंद त्यांना झाला आहे. यावेळी आमदार काळे यांच्या सोबत भैयालाल मावसकर, राजेंद्र येवले, शैलेश म्हाला, सुजित भास्कर, कुणाल काळे, आकाश खैरकर इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# संस्कार प्रायमरी इंग्लिश स्कूल व श्री संस्कार कोचिंग क्लासेसचे स्नेहसंमेलन




**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.7 )**– संस्कार प्रायमरी इंग्लिश स्कूल हिवरखेड येथे उधाण संस्कारांचे 2024-25 स्नेहसंमेलन व गुणवंत विद्यार्थी सोहळ्या निमित्त रंगतदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

उद्घाटनप्रसंगी सविता ठाकरे, अर्चना खांडेकर, माला भोजने, ज्योती भोजने, विवेक काळकर, योगेश गणोरकर तसेच संपूर्ण पालकवर्ग उपस्थित होते. गावातील शासकीय सेवेत रुजू झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार या प्रसंगी घेण्यात आला. यामधे मयूर गावंडे (क्स्ड्ढ), ऋशिकेष ढोमणे, हर्षल भुंते, अमित ठाकरे इत्यादी विद्यार्थ्यांचा सत्कार घेऊन त्यांना गौरविण्यात आले. तसेच इयत्ता 10 वी मधील व हृ.रूरूस. शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार घेण्यात आला. स्नेहसंमेलनाचे औचित्य साधून ढ्ढक्त टेस्ट बद्दल माहिती सांगण्यासाठी इंजी.शिवानी काळीवकर व अशोक काळीवकर (नायब तहसीलदार,तिवसा) उपस्थित होते. त्यांनी मुलांना अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये अतिशय सुंदर नृत्य प्रदर्शन करण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व रमाई, रामायण, भक्त प्रल्हाद, झाशीची राणी, शिवाजी महाराज, जय जवान जय किसान अश्या आणि वेगवेगळ्या थीम वर नृत्य सादर करण्यात आले. विशेष आकर्षण म्हणजे स्वत: मुख्याध्यापकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची तर पूजा काळकर यांनी रमाई ची भूमिका साकारली. तसेच सर्व शिक्षक वृंदानी झाशीची राणी जीवनपट प्रदर्शित केला. आनंद मेळाव्याने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# पिंपळोद गावात अनियमित पाणीपुरवठा

## नागरिकांची जिल्हाप्रशासनाकडे तक्रार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 7 )** – दर्यापूर तालुक्यातील पिंपळोद गावात मागील दोन वर्षापासून पंधरा दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. हा अनियमित पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा या मागणीसाठी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना सोमवारी(दि.6) निवेदन दिले.

दरम्यान या संदर्भात संबंधित विभागाकडे अर्ज, निवेदन, तक्रार करूनही कुठलीच कार्यवाही झाली नाही. दर महिन्याला नागरिक पाण्याचे बिल देतात तर मग महिन्यातून दोनदाच पाणीपुरवठा का होतो, असा प्रश्नही ग्रामस्थांनी निवेदनात विचारला आहे. येत्या 20 जानेवारी पर्यंत पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा अन्यथा 24 जानेवारीपासून आमरण उपोषण करू, असा इशारा निवेदनात



देण्यात आला आहे. येवदा येथील टाकीवरूनच पाणीपुरवठा पुरेसा होत नसल्याची तक्रार गावातील कर्मचारी दिलीप डोबाळे वारंवार करतात. मात्र असे असले तरी कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या कारभारामुळेच पिंपळोद गावात नियमित पाणीपुरवठा होत नसल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी,अशी मागणीही निवेदनात करण्यात आली. निवेदन देताना दिलीप राठी, बाळूभाऊ सदार, राजू गुरव, नाना डोरस, गणेश पातुर्डे, संजय भुते, संजय डोरस आदी उपस्थित होते.

## स्वातंत्रसैनिक एकनाथ हिरुळकर यांचे निधन

**अमरावती** – शंकरनगर येथील विक्रम टॉवरमधील रहिवासी स्वातंत्रसैनिक एकनाथ माधवसा हिरुळकर, वय 100 यांचे दि. 4 जानेवारी 2025 रोजी निधन झाले. जिल्हा प्रशासनातर्फे त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. एकनाथ हिरुळकर यांच्या पार्थिवावर दि. 5 जानेवारी 2025 रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आमदार रवी राणा, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, तहसिलदार विजय लोखंडे आणि श्रीमती यावलीकर उपस्थित होते. हिरुळकर यांना पुष्पचक्र अर्पण करुन श्रद्धांजली वाहण्यात आली.

## जाहीर सुचना

**अर्जदार :**– अमिरोद्दीन कदिरोद्दीन
रा. एकता नगर कांडली ता. अचलपूर जि. अमरावती

**विरूद्ध**

**गैरअर्जदार :**– मुख्याधिकारी, जन्म व मृत्यू विभाग,
नगर परिषद कार्यालय अचलपूर.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार अमिरोद्दीन कदिरोद्दीन रा. एकता नगर कांडली ता. अचलपूर जि. अमरावती यांची मुलगी अनम फातेमा अमिरोद्दीन यांचा जन्म दिनांक २५/०६/२०२२ रोजी परतवाडा, नगरपरिषद अचलपूर येथे झाला असून अर्जदार यांनी जन्म व मृत्यू अधिनियम कलम १३ (३) अन्वये सदर जन्माची नोंद होणेबाबत अर्ज या न्यायालयात सादर केला आहे.

त्याअर्थी, सदर अर्जाबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी सदर जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत स्वत: जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत तहसील कार्यालय, अचलपूर येथे हजर राहावे. अन्यथा कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत/आक्षेप नाही असे गृहित धरून अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी

दिनांक :– ३१/१२/२०२४

कोर्ट शिक्का

**निवासी नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अचलपूर**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार शमीम बानो मो. युनूस रा. विहीगांव बु. ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील रहिवाशी आहेत. त्यांच्या स्वत:च्या जन्माची नोंद नगर परिषद अंजनगांव येथे रजिस्टरमध्ये जन्माची नोंद नसल्याने त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माच्या नोंदीचे आदेश होण्याबाबतचा विनंती अर्ज या कार्यालयात दि. २१/८/२०२५ रोजी सादर केला आहे.

त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरून प्रसिद्ध करण्यात येते आहे शमीम बानो मो. युनूस यांचा जन्म विहीगांव येथे २९-०५-१९८२ रोजी झाला आहे. त्याबाबत कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार असल्यास किंवा प्रकरणात काही म्हणावयाचे असल्यास त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत स्वत: अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत अन्यथा ३० दिवसानंतर जर कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

कोर्ट शिक्का

**( रविंद्र काळे )
निवासी नायब तहसीलदार
अंजनगांव सुर्जी**